सकाळ
सकाळ अंकाविषयी प्रतिक्रिया व अंक घरपोच सुरू करण्यासाठी व्हॉट्सॲप क्रमांक
7410030245
(वेळ : सकाळी 10.00 ते सायं. 6.00)
जाहिरातींसाठी व्हॉट्सॲप क्र.
7410030246
(वेळ : दुपारी 2.00 ते रात्री 9.00)
Follow us on Sakalmarathwada @Marathwadasakal

सूर्योदय ५.५७ **सूर्यास्त** ६.५०

तापमान
कमाल ४१.१०°C किमान २१.०°C

पेट्रोल ₹ १०५.४१
डिझेल ₹९१.९०

सराफ बाजार
सोने २४कॅरट (प्रति १० ग्रॅम)
₹ १ लाख ५१ हजार
चांदी (प्रति १ किलो)
₹ २ लाख ५१ हजार

अवतीभवती

खुनाच्या गुन्ह्यातील अल्पवयीन ताब्यात

जालना : चंदनझिरा पोलिसांनी खुनाच्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या ४ तासांत छडा लावत दोन विधिसंघर्ष बालकांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन धारदार खंजीर जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणातील आणखी एका साथीदाराचा शोध सुरू आहे. दरम्यान, वडिलांच्या हत्येचा बदला खून करून घेतल्याची कबूली एकाने दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (ता. सात) रात्री चंदनझिरा परिसरातील एकता चौकाजवळ जितेंद्र रवी आडसूळ (वय ३५, रा. बदनापूर) यांचा अज्ञात तिघांनी खून केला होता. याप्रकरणी चंदनझिरा पोलिस ठाण्यात त्यांच्या पत्नीच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान आरोपी सिल्लोड (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी मध्यरात्री तांडा बाजार (ता. सिल्लोड) परिसरात शोधमोहीम राबवून दोन विधिसंघर्ष बालकांना ताब्यात घेतले. दरम्यान, मृत जितेंद्र आडसूळ याने वर्ष २०२१ मध्ये आपल्या वडिलांची हत्या केल्याचा राग मनात ठेवून खून केल्याची कबुली एकाने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींना जालन्यात आणल्यानंतर त्यांनी गुन्ह्यात वापरलेले दोन धारदार खंजीर आणि दुचाकी पोलिसांनी जप्त केली.

पाच दुचाकी जप्त करून एकाला केली अटक

जालना : कदीम जालना पोलिसांनी चोरीच्या दुचाकी प्रकरणात कारवाई करत पाच दुचाकी जप्त केल्या असून, सुमारे १ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याप्रकरणी आरोपी रवींद्र आनंद सिंह (वय ३८) याला गुरुवारी (ता.७) अटक करण्यात आली आहे. गुरुवारी शहरातील जांगडे पेट्रोलपंप परिसरात एक व्यक्ती चोरीच्या दुचाकी विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार कदीम जालना पोलिसांनी सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याच्याकडील दुचाकी चोरीच्या असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीकडून विविध कंपनीच्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या. संबंधित आरोपीविरुद्ध कदीम जालना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांच्या पथकाने केली.

विजेचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू


शुभम बासनवाल

नळणी : नळणी बु.येथील शुभम सुरेश बासनवाल या २१ वर्षीय तरुणाचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी (ता.८) सायंकाळी घडली. शुभम हा गच्चीवरील बाथरूमचे काम चालू असल्यामुळे बाथरूमवर पाणी मारत होता, तर वडील बाहेरून पाणी देत होते. दरम्यान, अचानक पाण्यात वीज प्रवाह उतरून शुभमला शॉक लागल्याने वडिलाने वीज प्रवाह तत्काळ बंद केला. तोपर्यंत शुभम छतावरून खाली कोसळला. त्याला ग्रामीण रुग्णालयात राजूर येथे नेण्यात आले; परंतु डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.


जालना : येथील राजर्षी शाहू इंग्लिश स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.


जालना : दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर जल्लोष करताना येथील राजर्षी शाहू इंग्लिश स्कूलचे गुणवंत विद्यार्थी.

शहरासह जिल्ह्यातील शाळांनी मिळवले यश

दहावी परीक्षेचा निकाल जाहीर; यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव


शारीवा मुकीम

जालना, ता. ८ : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा शुक्रवारी (ता. आठ) ऑनलाइन निकाल जाहीर झाला. दरम्यान, निकाल जाहीर होताच ठिकठिकाणी विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष करून आनंदोत्सव साजरा केला.

राजर्षी शाहू इंग्लिश स्कूल

जालना : येथील भिलदरी बहुउद्देशीय संस्थेचे राजर्षी शाहू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला. युवराज गायकवाड या विद्यार्थ्याने ९२.८० टक्के घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. आदित्य गिते ९१.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर पूर्वा थोरात या विद्यार्थिनीने ८९.८० टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळविला आहे. याबद्दल या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा रेवती मांटे, सचिव डॉ. सुगदेव मांटे, प्राचार्या लतिका मनोज, डॉ. वर्षा शेळके, वरुण अंबेकर, डॉ. तुकाराम कोकरे, पल्लवी काळे, अभिजित भंडारे, अपर्णा भंडारे, रेखा शेळके, प्रियंका शिंदे, अंकिता सरनाईक, विजयश्री वारे, विलास पवार, लवली अग्रवाल, आरती वाघमारे आदींनी अभिनंदन केले आहे.

आसाराम पाटील विद्यालय, घानेवाडी

जालना : घाणेवाडी येथील आसाराम पाटील विद्यालयाने उज्ज्वल यश संपादन करत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातून एकूण २७ विद्यार्थी दहावी बोर्ड परीक्षेस बसले होते. त्यापैकी तब्बल १८ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले असून ७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर २ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश संपादन केले आहे. अश्विनी डोंगरे हिने ९० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. दर्शना डिघे हिने ८९.७० टक्के गुणांसह द्वितीय तर सानिका चंद हिने ८९ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. तसेच प्रणव खिल्लारे याने ८७.२० टक्के आणि शिवकन्या चंद हिने ८६.६० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश प्राप्त केले. तसेच पूजा वाढेकर ८५.६०टक्के, ध्रुवराज डिघे ८४ टक्के , अनिकेत क्षीरसागर ८२.२० टक्के आणि कार्तिक काटकर ८०.२० टक्के यांनीही उज्ज्वल यश संपादन करून विद्यालयाच्या लौकिकात भर घातली आहे. संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब कावले, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

राष्ट्रीय हिंदी विद्यालय

जालना : राष्ट्रीय हिंदी विद्यालयाने निकालाची परंपरा कायम राखली आहे. या वर्षी प्रशालेतून २४७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यातील २४५विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाची टक्केवारी ९९.१९ टक्के इतकी आहे. प्रशालेतून सर्वप्रथम सार्थक तायडे ९३.४० टक्के, द्वितीय रणवीर उढाण ९३.२० टक्के, तृतीय टीना वर्मा ९१.८० टक्के गुण मिळवले आहे. प्रशालेतून एकूण ४८ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे अध्यक्ष, संस्थेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी अभिनंदन केले आहे.

संस्कार प्रबोधिनी विद्यालय

जालना : येथील संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९८.७५ टक्के लागला असून ३१ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण घेऊन यश संपादन केले आहे. एकूण १६० विद्यार्थ्यांमध्ये अक्षय कुलकर्णी ९६.६० टक्के, वेदा ठोंबरे ९६.६० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे. प्रतीक पवार, ज्ञानेश्वरी कांबळे ९६.४० टक्के, राशी जगताप ९५.६० टक्के, ओम माने ९५.४० टक्के , नंदिनी कल्याणकर ९५.२० टक्के, प्रतिक्षा नवघरे ९४.८० टक्के, श्रेयश कुलकर्णी ९४.६० टक्के, सोहम देशमुख ९४.६० टक्के, श्रीश चिंचाणे ९४.४० टक्के, शताक्षी शहापूरे ९४.२० टक्के, समीक्षा उगले ९४ टक्के, सुयोग सदाव्रते ९३.६० टक्के, तन्वी सोनवणे ९३.४० टक्के, श्रद्धा नरवडे ९२.८०, श्रेयश गोरे ९२.६०, चिन्मय कस्तुरे ९२.२०, रोहित खुरपे ९२.००, मयूर गरड,९१.८०, पूनम घातरे ९१.६०, नंदिनी खांडेभराड ९१.४०, तनिष्का सतकर ९०.६०, श्रृती शिंदे ९०.६०, अभिषेक गोंदीकर ९०.४०, कार्तिक घुले ९०.४०, तृप्ती शिंदे ९०.४०, पलक खिरे ९०.४०, वैष्णवी वाघ ९०. २०, श्रेया जपे ९०.०० टक्के गुण घेऊन यश संपादन केले आहे. दरम्यान, ३१ विद्यार्थ्यांनी ९०टक्के पेक्षा जास्त गुण संपादन केले आहे. ७५ ते ९० यामध्ये ४३ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी, सचिव विजय देशमुख, विनायकराव देशपांडे, प्रा. केशरसिंह बगेरिया डॉ. जुगलकिशोर भाला, डॉ. दीपक मंत्री, भास्कर काळे, मुख्याध्यापक ईश्वर वाघ, रामदास कुलकर्णी आदींनी अभिनंदन केले आहे.

साईबाबा माध्यमिक विद्यालय

जालना : श्री साई समर्थ बहुउद्देशीय संस्था अकोला निकळक (ता. बदनापूर) संचलित साईबाबा माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८८.८८ टक्के लागला असून १२६ पैकी ११२ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष गजानन गिते, सचिव सुनीता गिते, बळिराम गिते, मुख्याध्यापक गजानन डोईफोडे, वर्गशिक्षक शेळके तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

जिल्हा परिषद प्रशाला, तळणी

तळणी : येथील जि. प. प्रशालेचा निकाल ६०. ३४ टक्के लागला. तीन विद्यार्थी विशेष प्रावीण्य श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. उर्वी संदीप पाटील हिने ९२ टक्के गुण घेऊन प्रथम येण्याचा मान मिळवला.तर कृष्णा श्रीधर मुळे याला ८५.८० टक्के गुण द्वितीय क्रमांक मिळवला. किरण अरुण हनवते ही ८५ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शालेय व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी समिती, मुख्याध्यापक बालाजी मुंडकर, गजानन गवई, दिलीप ठाकरे, भीमराव फंदे, आनंद पंडागळे, प्रल्हाद डोईफोडे, संतोष डोईफोडे, ओमकार शर्मा, दादाराव शिंदे, गजानन धारतकर, रामेश्वर मुळे, शुभम राऊत, मोहन चव्हाण, संदीप जाधव आदींनी अभिनंदन केले आहे.

छत्रपती शिवाजी हायस्कूल

अंकुशनगर : अंबड तालुक्यातील अंकुशनगर येथील छत्रपती शिवाजी हायस्कूल शाळेचा निकाल ९२ टक्के लागला. यामध्ये वेदिका गोपाळघरे व श्रेयस निवारे ९४ टक्के गुण मिळवून प्रथम, प्रसाद नरवडे ९३.८० टक्के द्वितीय, शौर्य मापारी ९३.६० टक्के घेऊन तृतीय आला आहे. विशेष प्रावीण्यात १११ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १४४, द्वितीय श्रेणीत १२६, तृतीय श्रेणीत ५८विद्यार्थी आले आहेत. यात प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ काही विद्यार्थ्यांनी समान गुण घेतले. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

मत्स्योदरी विद्यालय, लोणार भायगाव

अंबड : लोणार भायगाव येथील मत्स्योदरी विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला. शाळेतून एकूण ४६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यामध्ये विशेष प्राविण्यामध्ये २१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २० विद्यार्थी, व्दितीय श्रेणीत ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, सचिव मनीषा टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बाबासाहेब गायकवाड, सहायक प्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर, मुख्याध्यापक सुभाष शेरे, रमेश तिकांडे, बालासाहेब डहाळे, अमोल देशमुख, दिलीप पैठणे, पांडुरंग बोडखे, सुखदेव लबडे आदींनी अभिनंदन केले आहे.

स्वामी विवेकानंद हायस्कूल

जाफराबाद : स्वामी विवेकानंद हायस्कूलने उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. १६२ विद्यार्थ्यांपैकी १५४ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. प्रथम क्रमांक कुमारी कल्याणी कृष्णा शिंदे ९१.२०टक्के, द्वितीय क्रमांक पायल रतन पाचरणे ८९.४० टक्के, तृतीय क्रमांक अंजली ऋषिंधर निकष ८८ टक्के गुण घेतले आहे. १५४ विद्यार्थ्यांपैकी प्रावीण्य श्रेणीत ४८ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ६० विद्यार्थी, द्वितीय श्रेणीमध्ये ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेच्या गुणवत्तापूर्ण निकालाबद्दल प्राचार्य शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

जे.बी.के. विद्यालय

टेंभुर्णी : येथील जे.बी. के.विद्यालयाचा निकाल ७३.३३ टक्के लागला आहे. यावर्षी २२५ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते, पैकी १६५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्रावीण्यासह प्रथम श्रेणीत एकूण २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा मान श्वेता बालासाहेब घुगे हिने पटकावला आहे.(९२.४० टक्के) द्वितीय क्रमांक श्रावणी सुनील डोमळे (९१ टक्के), तिसरा क्रमांक ईश्वरी ज्ञानेश्वर गोरे (८९.६० टक्के) चौथा क्रमांक वेदिका रवींद्र उजेड (८९ टक्के) तर पाचवा क्रमांक सार्थक प्रदीप खजाने (८८.८०टक्के) यांनी पटकावला आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, उपाध्यक्ष जमीर अमीर शेख, सचिव सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक मधुकरराव निकम, प्रेमसुख काबरा, विश्वनाथ सांगुळे, प्रा. दत्तात्राव देशमुख, प्रदीप काबरा, प्रदीप मुळे, संजय कुलकर्णी, भिवसन ससाणे, एस.बी. बोरकर, विष्णू जाधव, प्रा. सुनील बनसोडे, प्रा. डॉ.अरुण आहेर, प्रा. रामदास भांगे, प्रा. गजानन धोटे, प्रा. कैलास जाधव, प्रा.डॉ. आनंदराव जाधव, रमेश इंगळे, कैलास भुतेकर, राजेश शेवाळे, राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे, समाधान कांबळे, दत्तात्रय उखर्डे, सी.डी उखर्डे, उज्वला आवटी, एफ.ए. शेख, माधुरी पाटील, मंजूषा भिलावेकर, ज्योती जाधव, विजया शिल्लार, वासुदेव क्षीरसागर, सुनील सकुंडे, राजूभाऊ डोमळे, नागोराव देशमुख, दीपक देशमुख आदींनी अभिनंदन केले आहे.

शांतिनिकेतनचे गुणवंत विद्यार्थी


भूमिका डिघे


शुभम शेळके


गोविंद जाधव

शांतिनिकेतन विद्यामंदिर, जालना


आश्विनी लामगे


श्रुती आगळे

जालना : येथील संभाजीनगर प्रभागातील समर्थ शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित शांतिनिकेतन विद्यामंदिर या शाळेने दरवर्षीप्रमाणे यंदाही उज्वल यशाची परंपरा कायम राखत १०० टक्के निकाल लागला आहे. शुभम शेळके या विद्यार्थ्यांनी ९४.८० टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला तर चंचल राजेंद्र मगर हिने ९२.८० टक्के गुण घेऊन द्वितीय तर श्रुती कैलास आगळे हिने ९१.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. संस्थेचे अध्यक्ष भास्कर अंबेकर यांच्यासह संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. राम कदम, सचिव बिजू वाघमारे, संचालक हरिहर शिंदे, गणेश तरासे, नगरसेवक आश्विन अंबेकर, शोभा अंबेकर, नंदकुमार जाधव, रामचंद्र चौधरी यांनी अभिनंदन केले आहे.


शिवराज माळोदे


संस्कृती चापाकानडे


ज्ञानराज बन

शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय

कुंभार पिंपळगाव : मूर्ती (ता. घनसावंगी) येथील शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८६.७९ टक्के लागला. एकूण ५३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी ४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात प्रथम शिवराज रामेश्वर माळोदे(८५ टक्के), द्वितीय ज्ञानराज रत्नेश्वर बन (८२.४० टक्के) तर तृतीय संस्कृती लक्ष्मण चापाकानडे (७६.२०टक्के) गुण घेऊन तर विशेष प्रावीण्यासह तीन, प्रथम श्रेणीत २३, द्वितीय श्रेणीत १३ तर तृतीय श्रेणीत सात विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रवींद्र तौर, सचिव किरण तौर, उपाध्यक्ष धीरजसिंह तौर, संचालक डॉ. सूरजसिंह तौर, संचालिका डॉ.स्नेहा तौर, संचालिका प्रणल तौर, प्रशासकीय अधिकारी विनोद कऱ्हाडे, मुख्याध्यापक ज्ञानदेव सोळंके यांच्यासह शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

तेजस्विनी सातपुते द्वितीय


तेजस्विनी सातपुते

जालना : येथील अंकुर बालक मंदिर शाळेची विद्यार्थीनी तेजस्विनी रामेश्वर सातपुते हिने दहावी बोर्ड परीक्षेत ९७ टक्के गुण मिळवून शाळेत द्वितीय येण्याचा मान मिळवला. सामान्य परिस्थितीत परिश्रम घेऊन तिने हे यश मिळविले. मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकवृंद तसेच नातेवाईक यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

देशमुख विद्यालय, घनसावंगी

घनसावंगी : मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कै.दत्तासाहेब देशमुख उच्च माध्यमिक विद्यालय घनसावंगी येथील निकाल ७६ .७३ टक्के लागला.एकूण २८७ विद्यार्थी उत्तीर्ण तर ८७ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, सचिव मनीषा टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बी. आर. गायकवाड, सहायक प्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर, मुख्याध्यापक केशव अटकर आदींनी अभिनंदन केले आहे.


अंबड : शहरातील श्रीमती चंद्रप्रभा स्वरूपचंद कासलीवाल जैन इंग्लिश स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थी,पालक यांचा गौरव करताना शाळेचे अध्यक्ष डॉ.प्रवीणकुमार कासलीवाल.

जैन इंग्लिश स्कूल, अंबड

अंबड : शहरातील श्रीमती चंद्रप्रभा स्वरूपचंद कासलीवाल जैन इंग्लिश स्कूलचा निकाल शंभर टक्के निकाल लागला. शाळेतून सर्वप्रथम क्रमांक आदीबा सिद्दिकी हिने ९८:४० टक्के, द्वितीय क्रमांक सार्थक नांद्रे ९८:२० टक्के तर तृतीय क्रमांक अक्षदा मस्के हिने ९६:८ टक्के गुण मिळवले. शाळेतील ९० टक्यांपेक्षा जास्त विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. शाळेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व पालकांचा गौरव शाळेचे अध्यक्ष डॉ.प्रवीणकुमार कासलीवाल यांचे हस्ते करण्यात आला. डॉ.रमेशचंद्र गंगवाल, शिरीष सावजी, प्रवीण बाकलीवाल, संजय चांदीवाल, सुरेश दिडपोळे, राजेंद्र काला, डॉ.नरेश अग्रवाल, डॉ.संतोष मोहळे, चंद्रप्रभू दिडपोळे, संजय इंचूरे, मुकेश सावजी, संतोष बाकलीवाल, दीपक पाटणी, भूषण काला, डॉ.अनिल पांडे, दिलीप बुर्ले, मुख्याध्यापक नंदकिशोर भारद्वाज, बाबासाहेब वैराळ, हरीचंद्र जरांगे, संकेत राऊत, वैभव वादेसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदनकेले आहे.

पंजाब नॅशनल बँक भारत सरकारचा उपक्रम | pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)
एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेद्वारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.०३.२०२६ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा - संभाजीनगर, जालना (777800)** **कर्जदार - मे. उदय ट्रॅक्टर सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस,** गट नं. 228 आणि 229, जालना-नाव्हा (सिंदखेड राजा) रोड, ताज पेट्रोल पंप जवळ, मौजे नाव्हा, ता.जि. जालना- 431 203. **तसेच राहणार श्री. बाळासाहेब नारायण गजर (प्रोपायटर)** गट नं. 228 आणि 229, जालना-नाव्हा (सिंदखेड राजा) रोड, ताज पेट्रोल पंप जवळ, मौजे नाव्हा, ता.जि. जालना- 431 203. **श्री. बाळासाहेब नारायण गजर (प्रोपायटर)** पत्ता - गुंडेवाडी राजुर रोड, ता. जि. जालना- 431 203	नोंदणीकृत गहाण असलेले गट नं. 228 आणि 229, एकुण एरिया 8850 स्क्वे.मी., जालना- नाव्हा (सिंदखेड राजा) रोड, ताज पेट्रोल पंप जवळ, मौजे नाव्हा, ता.जि. जालना- 431 203. **मालकी हक्क नावे - श्री. बाळासाहेब नारायण गजर, चतुःर्सिमा - पुर्व -** गट नं. 29 मधील शेत जमीन आणि सरकारी रस्ता, **पश्चिम -** हरीभाऊ साळुंके यांची शेत जमीन, **उत्तर -** नाव्हा सिंदखेड राजा रस्ता आणि श्री विष्णु श्रीरसागर यांची गट नं. 229 मधील जमीन आणि इतर, **दक्षिण -** सरकारी रस्ता **प्रोपर्टी आयडी- PUNB4LI57825922**	अ) २३.०४.२०२४ ब) रु. ३५,५५,५३५.६९/- + व्याज आणि इतर खर्च क) २२/०८/२०२४ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. १२३.३६ लाख ब) रु. १२.३३६ लाख (२६.०५.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. २६.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **26.05.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताद्वारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - ०९.०५.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

स्वाक्षरी/-
श्री. सजिल कुमार
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

